संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तरुणाईचे हकनाक बळी

**गुजरातमध्ये** सुरत शहरामध्ये घडलेली आगीची भीषण दुर्घटना आणि त्यात वीस तरुण विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू अत्यंत वेदनादायक ठरतो. ज्या देशाच्या लोकसंख्येमध्ये सर्वाधिक तरुणांचे सर्वाधिक प्रमाण आहे. अशी युवाशक्ती एखाद्या देशाला काही शतकानंतर भाग्यानुसारच मिळते. भारतात या युवा शक्तीचा विचारच होत नाही आणि मग अनेक प्रकारचे अपघात हेसुध्दा या युवाशक्तीचा नाश करण्यासाठी पुरेसे ठरतात. कोचिंग क्लाससाठी गेलेले विद्यार्थी इतक्या विचित्र आगीच्या कचाट्यात सापडावेत की त्यांना आपला जीव वाचवण्यासाठी चौथ्या मजल्यावरून उड्या मारण्याची वेळ यावी आणि त्यात अनेक विद्यार्थ्यांचा मृत्यू व्हावा. ही दुर्घटना केवळ एक अपघात म्हणून सोडून देता येणार नाही. आपल्या आयुष्याच्या एका निर्णायक वळणावर आलेली आणि खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनाची सुरुवात होऊ घातलेली तरुणाई आगीच्या ज्वाळांमध्ये होरपळावी याच्याइतका निष्काळजीपणाचा किंवा बेदरकारपणाचा दुसरा प्रकार असू शकत नाही. गेल्याच वर्षी मुंबईत परळच्या कमला मिल आवारात लागलेल्या आगीची यानिमित्ताने आठवण झाली. फक्त फरक एवढाच होता की त्यातले तरुण हे हॉटेलमध्ये बसले होते. तर सूरतेत शिक्षण घेणाऱ्या कोवळ्या वयातल्या विद्यार्थ्यांवर हा दुर्दैवी प्रसंग ओढवला. प्रत्येकवेळी आग लागल्यानंतर शॉर्टसर्किटचे कारण पुढे केले जाते परंतु ते तितकेसे खरे नसते. आग भलेही शॉर्ट सर्किटमुळे लागलेली असेल पण अनेक वेळेला शॉर्ट सर्किट वारंवार का व्हावेत इथपासून असे प्रकार घडल्यानंतर मदत यंत्रणा कुठे असतात किंवा त्या संकटातून बाहेर पडण्याचे कोणते उपाय योजलेले असतात. यासंदर्भात भले मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होते. प्रामुख्याने शहर किंवा महानगरातले दैनंदिन जीवन इतके बेभरवशाचे झाले आहे की कोणत्या कारणाने मृत्यू झडप घालेल हे सांगता येत नाही. सगळ्या प्रकारचे कायदे नियम धाब्यावर बसवले जातात. सुरक्षिततेच्या उपाययोजना गुंडाळून ठेवल्या जातात. जास्तीत जास्त पैसा ओरबाडण्याकरीता कशाही प्रकारची बांधकामे केली जातात आणि अक्षरशः लोकांच्या जीवाशी खेळ केला जातो.

### सुरक्षेच्या उपायोजनांकडे दुर्लक्ष

आपल्या देशामध्ये बांधकामांची किंवा व्यवसायाची वर्गवारी केली जात नाही. कोणता व्यवसाय कुठे असावा. त्या व्यवसायाला पूरक जागा कोणती असावी. मग त्यात हॉटेल्स इतर अनेक व्यवसाय याची वर्गवारी करून त्यांच्या बांधकामांचे स्वरुप ठरवले जात नाही. किंवा त्याबाबतचे नियम काटेकोरपणे पाळले जात नाही. सूरतमध्ये ज्या कोचिंग क्लासला आग लागली त्याच्या खाली म्हणजेच तळमजल्याला हॉटेल्स आणि इतर व्यवसायांना परवानगी दिली गेली होती. कोचिंग क्लासला पाचवा मजला दिला गेला. कोचिंग क्लास म्हटल्यानंतर फक्त शिकवण्याचेच काम चालणार असल्यामुळे अनेक सुविधांकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले गेलेले दिसून येते. ज्याप्रमाणे केव्हाही आग लागू शकते तिचा भडका उडू शकतो त्यासाठी आग विझवणारी अंतर्गत योजनाच उपलब्ध नसावी. शिवाय कोणत्याही प्रकारच्या अचानक उद्‌भवलेल्या संकटातून बाहेर पडण्याकरीता पुरेसे मार्गही उपलब्ध नव्हते. ज्या सुरक्षिततेच्या उपाययोजना प्रत्येक ठिकाणी उपलब्ध असल्याच पाहिजेत. दुर्दैवाने सुविधांकडे दुर्लक्ष करून केवळ स्वतःचा विचार करणाऱ्या गोष्टींना प्राधान्य दिले जाते आणि अशी संकटे आपण आपल्यावर ओढवून घेतो. परळच्या कमला मिलमध्येसुध्दा अशीच बेपर्वाई आढळून आली होती. तिथे तर आयटी पार्क किंवा आयटी उद्योगाशी संबंधित घटकांसाठी परवानगी घेतली गेली. पण प्रत्यक्ष त्या जागेमध्ये हॉटेल्स आणि गुटख्याची दुकाने थाटली गेली. म्हणजे ज्यासाठी जे बांधकाम केले गेले त्याचा त्या कारणासाठी वापर केला जात नाही. किंवा जिथे जे व्यवसाय करणे अयोग्य आहे. तिथे त्यांना परवानगी दिली जाते. हा सगळा सरकारी कारभारातला बेजबाबदार आणि बेदरकारपणा अक्षरशः दरवर्षी शेकडो लोकांचे बळी घेताना दिसून येतो. या प्रवृत्तीवर पांघरूण घालण्याकरीता मग शॉर्ट सर्किटसारखी कारणे पुढे केली जातात. पैसा कमावण्याचा शॉर्टकट हे खऱ्या अशा अपघातामागचे कारण असते.

### अक्षम्य बेजबाबदारपणा

एकदा व्यवसायासाठी परवानगी दिल्यानंतर त्या ठिकाणी तोच व्यवसाय सुरु आहे की नाही किंवा आवश्यक त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना अस्तित्वात आहेत की नाहीत याची तपासणीच केली जात नाही. पैसे चारून धडाधड परवानग्या मिळवल्या जातात. गैरमार्गाने सुरु असलेल्या व्यवसायांनासुध्दा मुदतवाढ मिळते. या सर्व घटनांचे प्रमाण दरवर्षी कमी होण्याऐवजी वाढताना दिसते. याचा अर्थ घडलेल्या घटनेतून किंवा अपघातातून कोणताच धडा घेतला जात नाही. म्हणजेच उपाययोजनांबाबत गांभीर्य पाळले जात नाही. एवढेच नव्हे तर इतक्या मोठ्या संख्येने बळी गेल्यानंतरही त्यातल्या दोषींविरुध्द कोणतीही कारवाई होत नाही. किंवा झाली तरी त्याचे स्वरुप अतिशय सौम्य असते. कमला मिलप्रकरणातही तोच प्रकार घडला. संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे. एकालाही बडतर्फ केले गेलेले नाही. तशाच प्रकारचा हलगर्जीपणा सुरतमधल्या घटनेबाबतही होईल. मुळातच सूरत हे शहर व्यापारासाठी प्रसिध्द आहे. हिरे घासण्याचे महत्त्वाचे काम त्याठिकाणी चालते. त्याशिवाय कपड्यांचेही मोठे मार्केट सूरतमध्ये आहे. व्यवसायांची गर्दी या महानगरात होत असताना सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष झालेले दिसून येते. कोवळ्या तरुण वयातील विद्यार्थ्यांचे हे बळी म्हणजे निष्पाप जीवन उद्ध्वस्त करण्याचा अत्यंत कृतघ्नपणा ठरतो. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यावर हा प्रसंग आल्यामुळे शिक्षण घेणे हा तर काही दोष ठरत नाही. परंतु त्यासाठीसुध्दा अशा पध्दतीने जीव गमवावा लागत असेल परंतु या देशातल्या प्रशासन यंत्रणा बेजबाबदार आहेत असेच म्हणावे लागेल. जर त्याठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना भक्कम स्वरुपाच्या असत्या त्या उपाययोजनांची न चुकता तपासणी झाली असती तर हा प्रसंग उदभवला नसता किंवा त्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे बळी गेले नसते.